**Sale Notice**

**HYBRO FOODS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)**
**Liquidator: Roshen Chordiya**

Liquidator Address: 114, Solaris Hubtown, Near East-West Flyover, Andheri (E), Mumbai (M.H.)
Email: cirp.hybrofoods@gmail.com
Mob.- 7000911711

**E-Auction**

Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016

**Date and Time of E-Auction: 31th July 2025 at 3.00 pm to 4.00 pm**

**Last date of EMD Submission : 28th July 2025**

(With unlimited extension of 5 minutes each)

Dates for submission of eligibility documents by prospective bidder : 28th July 2025

Sale of Assets and Properties owned by **HYBRO FOODS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)** forming part of Liquidation Estate formed by the Liquidator, appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench vide order dated 27 March 2025 (order communicated on 29 March 2025). The sale will be done by the undersigned through the e-auction platform www.baanknet.com

INR.

| Asset | Block | Reserve Price | EMD Amount | Incremental Value |
|---|---|---|---|---|
| **Vehicles at Yeola,** Dist. Nashik (M.H.) Tata Truck - MH04GF3771, Tata Truck - MH04HD9036, Tata Truck - MH04HD9037 | B | **434625** | **43463** | **10000** |

**The E-Auction will be conducted on AS IS WHERE IS, AS IS WHAT IS, WHATEVER THERE IS BASIS and WITHOUT RECOURSE BASIS through the service provider i.e. www.baanknet.com.**

**Prospective bidders shall submit an undertaking that they do not suffer from any ineligibility under section 29A of the Code to the extent applicable and that if found ineligible at any stage, the earnest money deposited shall be forfeited.**

**Prospective Bidders shall submit the requisite documents, including a declaration of eligibility under Section 29A of the Insolvency and Bankruptcy Code through the electronic auction platform only. •**

**Prospective bidders shall deposit the Earnest Money Deposit (EMD) through the Baanknet auction platform**

**Sd/-**
**Roshen Chordiya**
**As Liquidator of Hybro Foods Private Limited**
**Vide NCLT order dated 27.03.25**
**Address: 114, Solaris Hubtown,N. S. Phadke Marg, Near East West Flyover, Andheri (E), Mumbai-400069;**
**Email: cirp.hybrofoods@gmail.com**
**IBBI Registration No.: IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347**
**AFA valid till 31st December 2025**

**Date: 20/07/2025**
**Place: Mumbai** **Contact No.: 7000911711**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# हे दहशतवाद विरोधी लढ्याचे यश

पहलगाम हल्ल्याला तीन महिने पूर्ण होत असताना या हल्ल्याचे बरेच राष्ट्रीय आणि जागतिक दूरगामी परिणामही समोर येऊ लागले आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे पाकिस्तानमध्येच जोपासली जाणारी लष्कर-ए-तय्यबा या दहशतवादी संघटनेचा दुसरा मुखवटा असलेल्या द रेझिस्टन्स फ्रंट म्हणजेच टीआरएफ या दहशतवादी संघटनेवर अमेरिकेनेदेखील बंदी घातली आहे. स्वाभाविकपणे अमेरिकेच्या या निर्णयावर भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचा तो एक मोठा परिणाम ठरतो. कारण त्यानंतर गेल्या तीन महिन्यांत जागतिक स्तरावर जेवढ्या काही परिषदा झाल्या त्या प्रत्येक ठिकाणी भारत सरकारने सातत्याने दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. दहशतवाद ही जागतिक समस्या आहे. एकूणच वैश्विक जीवनमूल्ये टिकवायची असतील तर माणूसकीलाच आव्हान देणारा हा दहशतवाद मुळासकट निपटून काढणे हे संपूर्ण जगाचेच कर्तव्य ठरते. कोणत्याही प्रकारच्या दहशतवादी विकृतीला प्रोत्साहन मिळणार नाही किंवा पाठीशी घातले जाणार नाही. याची खबरदारी प्रत्येक देशाने घेतली पाहिजे. असे मतप्रदर्शन भारताने प्रत्येक व्यासपीठावर अगदी जोरदारपणे केले. अमेरिकेसह अनेक युरोपियन राष्ट्रांनी भारताच्या या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. अगदी रशियानेसुद्धा भारताच्या भूमिकेचे नेहमीच समर्थन केले आहे. सातत्याने भारताकडून हा विषय अतिशय गांभीर्याने मांडला जातो आणि सगळ्या देशांना त्यात सहभागी होण्याचे वारंवार आवाहन केले जाते. त्याचाच हा परिणाम म्हटला पाहिजे. भारताने अमेरिकेच्या या भूमिकेचे स्वागत केले. कारण ऑपरेशन सिंदूर होण्याआधीपासूनच पाकिस्तानातल्या दहशतवादी संघटना वेगवेगळ्या युक्त्या प्रयुक्त्या करून जगभरात दहशतवादाचेच भरणपोषण करीत असते. ऑपरेशन सिंदूर ही प्रदीर्घ चालणारी प्रक्रिया ठरली असून, केवळ दहशतवादच नाही तर देशात छुप्या पद्धतीने चालणाऱ्या सगळ्याच राष्ट्रविरोधी कारवायांवर नजर ठेवण्याचे काम अधिक प्रखरपणे सुरू झालेले आहे. मग अगदी देशातल्या अनेक राज्यांमध्ये बोगस किंवा घुसखोर मतदारांपासून ते बनावट नोटा, मादक पदार्थांचा व्यापार, नक्षलवाद, या सगळ्याच देशाला पोखरून काढणाऱ्या प्रकारांविरूद्धही सुरू असलेल्या मोहिमेला ऑपरेशन सिंदूरच मानले जाते आहे.

### टीआरएफचा मुखवटा

दहशतवाद हा जितका सीमेपलिकडून आहे तितकाच तो सीमेच्या आतही फोफावल्याचे पाहायला मिळते. विशेषतः अनेक माफिया टोळ्यांशी संधान साधून देशविघातक, समाजविघातक कामे केली जातात. गेल्या काही वर्षात ड्रगची तस्करी, सोन्याची तस्करी आणि पुन्हा एकदा बनावट नोटांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. एकीकडे सीमेपलिकडून होणारी घुसखोरी थांबण्याकरीता प्रयत्न होत असताना भारताच्या अर्थव्यवहारात अस्थिरता आणण्याचा डाव खेळला जातो. बनावट नोटांच्या माध्यमातून तर अगदी वेगवेगळ्या प्रकारची भेसळयुक्त पदार्थ विकण्यापर्यंत ही देशविघातक कामे पाहायला मिळतात. दहशतवादाविषयी सहानुभूती असणारे काही घटकही सातत्याने देशात विद्वेषाचे किंवा अस्थिरतेचे वातावरण तापत ठेवण्याचा प्रयत्न करतात. तंत्रज्ञानाचा किंवा सोशल मीडियाचा यासाठी चपखलपणे वापर केला जातो. बोगस ॲप बनवणे त्यातून डिजिटल अरेस्टसारखे प्रकार करणे किंवा बँक खात्यांचे तपशील मागवून त्यातले पैसे लंपास करणे यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यरत असलेला सायबर माफिया हा प्रकारदेखील देशाच्या अर्थकारणाला आतमधून पोखरण्याचाच उद्योग करीत आहे. आता हळूहळू त्याच्याही नाड्या आवळल्या जात असल्याने परदेशातल्या डमी नावाने काम करणाऱ्या दहशतवादी संघटनांचाही त्यातून पर्दाफाश होतो आहे. टीआरएफ ही अशीच लष्कर-ए-तय्यबाची डमी संघटना आहे. भारतातल्या अनेक राज्यांमध्ये हा मुखवटा घालून लष्कर-ए-तय्यबाच कार्यरत असल्याचे पाहायला मिळाले. भारताने तर अशा काही महत्त्वपूर्ण दहशतवादी संघटनांची यादीच तयार केली आणि ती अमेरिकासह प्रमुख राष्ट्रांना पाठवली होती. कारण वेगवेगळ्या नावाने काम करणाऱ्या या संघटना सुरुवातीला स्वयंसेवी संस्था किंवा समाजसेवी संस्थेच्या नावाने काम करू लागतात. नंतर त्यांचा मूळ चेहरा उघडतो. ज्याप्रमाणे भारतात पीआयएफ यासारख्या संघटनेने स्वयंसेवी संस्थेचे रूप घेऊन २०४७ पर्यंत भारताच्या इस्लामीकरणाचाच आराखडा तयार केला होता. ते सगळेच षड्यंत्र भारताने उद्ध्वस्त केले. तसाच प्रकार या टीआरएफबाबतही आहे.

### अमेरिकेला जाणवलेला धोका

ज्याअर्थी अमेरिकेला या संघटनेला दहशतवाद्यांच्या यादीत टाकण्याची कारवाई करावी लागेल याचा अर्थ अमेरिकेला त्याची झळ पोहोचलेली दिसत नाही. किंबहुना भविष्यकाळात मोठ्या दहशतवादी हालचाली होण्याची शक्यता तिथल्या सुरक्षा यंत्रणांच्या लक्षात आली असावी. या टीआरएफला पाकिस्तानी लष्कराची पूर्ण मदत असते. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख स्वतः जातीने टीआरएफच्या हालचालींवर लक्ष ठेवून असतात. आणि आवश्यक ती रसदही पुरवत असतात. स्वाभाविकपणे अमेरिकेच्या या निर्णयातून पाकिस्तानचे लष्कर प्रमुख मुनीर यांना पहिला मोठा तडाखा बसला आहे. अमेरिकेच्या मनात स्वतःविषयी सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने मुनीर यांनी चालवला होता. परंतु दहशतवाद जोपासणाऱ्या देशाच्या लष्कर प्रमुखाविषयी अमेरिकेने एकाअर्थी अविश्वासच दाखवलेला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताने सुरू ठेवलेल्या दहशतवाद विरोधी मोहिमेला उशिरा का होईना, परंतु जगातल्या मोठ्या देशांकडून वेगवेगळ्या पद्धतीने समर्थन मिळते आहे. अमेरिकेने टीआरएफवर घातलेली बंदी हा भारताच्या दहशतवादविरोधी भूमिकेचा सकारात्मक विजय ठरतो. या प्रयत्नातून एक गोष्ट सिद्ध होते की, ती म्हणजे दहशतवादाविरुद्धचा लढा हा अजूनही प्रदीर्घ काळ भारतालाच पुढाकार घेऊन लढावा लागेल. जे देश स्वतःला महासत्ता किंवा विकसित म्हणवतात त्या देशांनासुद्धा सतत या गंभीर धोक्याची जाणीव करून देण्याचे कामही भारताला करावे लागेल. अर्थातच देशामध्ये कुठेही या विकृतीला डोके वर काढता येणार नाही. यासाठीदेखील आणखी सजग व्हावे लागेल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**माणसाचे दोन गुरू असतात. एक अनुभव आणि दुसरा कर्म. हे दोघेही सोबत राहतात. कर्म हे लढायला शिकवत असतो, आणि अनुभव हा जिंकायला शिकवत असतो.**

## पंचांग

**रविवार, २० जुलै, २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**





**आषाढ कृष्ण दशमी**
**नक्षत्र : कृतिका**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०६-११ मेष**
**०६-१२ ते २४-०० वृषभ**

**रवी उदय- ०६-१३**
**रवी अस्त- १९-१७**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### बीटरुट पराठा



★ **साहित्य :-** पीठ- दोन कप, बीटरुट- एक, आमसूल पावडर, मीठ- चवीनुसार, तिखट

★ **कृती :-** सर्वात आधी बीट धुवून किसून घ्या. आता एका पॅनमध्ये तेल गरम करा आणि बीटरुट शिजवा. बीटरुटचे पाणी सुकले की, त्यात मसाले घाला. ताट झाकून ठेवा आणि मसाला २ मिनिटे शिजवा. आता मिश्रण थंड करा. एका वेगळ्या भांड्यात पीठ मळून घ्या आणि १० मिनिटे बाजूला ठेवा. आता त्याचे गोळे बनवा, त्यात मसाल्याचे मिश्रण भरा आणि पराठा लाटून घ्या. आता पॅन गरम करा आणि दोन्ही बाजूंनी तूप लावा आणि पराठा बेक करा. तयार केलेला पराठा लोणचे किंवा चटणीसोबत सर्व्ह करा.



# बीसीसीआयचा एसीसी बैठकीला जाण्यास नकार

## ठिकाण बदलण्याची मागणी! आशिया कपवर प्रश्नचिन्ह



**बांगलादेशमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे ढाका येथे होणाऱ्या आशियाई क्रिकेट परिषदेच्या (एसीसी) बैठकीला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने उपस्थित राहण्यास नकार दिला. जर आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी बैठक इतरत्र हलवली नाही तर आशिया क्रिकेट कप २०२५ च्या आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल.**

■ ढाका

**आशिया** कप भारताच्या यजमानपदाखाली आयोजित केला जाणार आहे. एसीसी लवकरच या स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करणार आहे. आशिया कपचे सामने सप्टेंबरमध्ये खेळवता येतील. त्यापूर्वी २४ जुलै रोजी ढाका येथे एसीसीची बैठक होणार आहे. बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले की, नक्वी बैठकीबाबत भारतावर अनावश्यक दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत, आम्ही नक्वी यांना बैठकीचे ठिकाण बदलण्याची विनंती केली होती. परंतु अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. आशिया कप तेव्हाच होऊ शकतो जेव्हा बैठकीचे ठिकाण ढाकाहून बदलले जाईल. जर मोहसिन नक्वी ढाकामध्ये बैठक घेत असतील तर बीसीसीआय कोणत्याही प्रस्तावावर बहिष्कार टाकेल.

बांगलादेशमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे बीसीसीआयने बैठकीत सहभागी होण्यास नकार दिला. त्याचवेळी, बीसीसीआय आणि बीसीबीने परस्पर संमतीने ऑगस्टमध्ये होणारी मर्यादित षटकांची मालिका पुढे ढकलली. दोन्ही देशांमधील ही मालिका आता सप्टेंबर २०२६ मध्ये खेळवली जाईल. भारतीय संघाने २०२३ च्या आशिया कपसाठी पाकिस्तानला जाण्यास नकार दिला आणि भारताच्या सामन्यांसाठी श्रीलंकेला तटस्थ ठिकाण म्हणून निवडण्यात आले. या वर्षाच्या सुरुवातीला पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन केले होते. परंतु भारताने सीमा ओलांडण्यास नकार दिला आणि त्याचे सर्व सामने दुबईतील तटस्थ ठिकाणी खेळले.

# फलंदाज ऋतुराज गायकवाड काउंटी क्रिकेटमधून बाहेर

■ लंडन



**भारताचा** मधल्या फळीतील फलंदाज ऋतुराज गायकवाड वैयक्तिक कारणांमुळे काउंटी चॅम्पियनशिपमध्ये यॉर्कशायरकडून खेळू शकणार नाही. त्याने यॉर्कशायरशी पाच सामन्यांमध्ये खेळण्यासाठी करार केला होता, ज्याची सुरुवात २२ जुलै रोजी स्कारबोरो येथे गतविजेत्या सरेविरुद्धच्या सामन्याने झाली. यॉर्कशायरचे मुख्य प्रशिक्षक अँथनी मॅकग्रा म्हणाले, दुर्दैवाने गायकवाड आता वैयक्तिक कारणांमुळे काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळू शकणार नाहीत. हे निराशाजनक आहे. मी तुम्हाला कारणांबद्दल काहीही सांगू शकत नाही, परंतु आम्हाला आशा आहे की सर्व काही ठीक होईल. रणजी ट्रॉफीमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या ऋतुराज गायकवाडने सहा एकदिवसीय आणि २३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

# शमी पश्चिम बंगालकडून खेळणार

## ५० संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश

■ कोलकाता



**भारतीय** क्रिकेट संघाबाहेर असलेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचा पश्चिम बंगालने २०२५-२६ च्या स्थानिक हंगामासाठी ५० संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश केला. शमी इंग्लंडमधील भारताच्या कसोटी संघाचा भाग नाही आणि आयपीएल २०२५ पासून त्याने कोणताही सामना खेळलेला नाही.

२८ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफीमध्ये शमी पूर्व विभागीय संघाचा भाग असू शकतो. ही स्पर्धा त्याच्या जुन्या फॉरमॅट, इंटर-झोनलमध्ये खेळवली जाईल. शमीने ६४ कसोटी, १०८ एकदिवसीय आणि २५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. आयपीएलमध्ये शमीचा नवीन संघ सनरायझर्स हैदराबाद सहाव्या स्थानावर राहिला आणि त्याची कामगिरीही प्रभावी नव्हती. त्याने ९ डावांत ६ बळी घेतले आणि प्रति षटक ११.२३ धावा दिल्या. शमी यापूर्वी दुखापतीमुळे बराच काळ बाहेर होता. ज्यामध्ये त्याच्या घोट्यावर शस्त्रक्रिया झाली होती आणि त्याला गुडघ्याच्या समस्या देखील होत्या.

# फ्रीस्टाईल ग्रँड स्लॅम स्पर्धेतून भारताचा आर. प्रज्ञानंद बाहेर

■ लास वेगास

**साडेसात** लाख अमेरिकी डॉलरची बक्षिसे असलेल्या फ्रीस्टाईल ग्रँड स्लॅम टूरमध्ये ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हचा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. परंतु आर. प्रज्ञानंदला अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाविरुद्ध पराभव पत्करावा लागल्याने तो जेतेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडला. अर्जुनने अब्दुसत्तोरोववर १.५-०.५ असा विजय मिळवला, तर प्रज्ञानंदने काऊआनाविरुद्ध ३-४ अशी चुरशीची लढत गमावली.

लेव्हॉन अरोनियन आणि हॅन्स मोके निमन या अमेरिकन जोडीने उपांत्यपूर्व फेरीत अनुक्रमे देशबांधव हिकारू नाकामुरा आणि उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव यांचा पराभव केला. अरोनियनने चार गेम्समध्ये २.५-१.५ अशा फरकाने विजय मिळवला, तर निमनने सिंदारोव्हला ४-२ ने पराभूत करताना बराच वेळ घेतला. उपांत्य फेरीत अर्जुनचा सामना अरोनियनशी होईल तर निमनची लढत काऊआनाशी होईल. खालच्या गटात जागतिक क्रमवारीतील अव्वल क्रमांकाचा खेळाडू मॅग्नस कार्ल्सलेनने पुन्हा एकदा विजयी लय मिळवली आणि विदित गुजरातीला २-० असे पराभूत केले. अमेरिकेच्या वेस्ली सोने त्याचा देशबांधव सॅम्युअल सेव्हियनविरुद्ध १.५-०.५ असा विजय मिळवला, तर लेनियर दुमिंग्वेझ पेरेझने कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध १.५-०.५ असा सहज विजय मिळवला. जर्मनीच्या विन्सेंट केमरने अमेरिकेच्या रॉबसन रे याचा २.५-१.५ अशा फरकाने पराभव केला.

# वरिष्ठ महिला राष्ट्रीय हॉकी शिबिरासाठी ४० खेळाडू घोषित

■ नवी दिल्ली

**स्पोर्ट्स** अथॉरिटी ऑफ इंडिया सेंटर येथे २१ जुलै ते २९ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय हॉकी प्रशिक्षण शिबिरासाठी हॉकी इंडियाने ४० खेळाडूंची नावे जाहीर केली.५ सप्टेंबरपासून चीनमधील हांगझोऊ येथे होणाऱ्या महिला आशिया कपच्या पार्श्वभूमीवर हे शिबिर खूप महत्त्वाचे मानले जात आहे. ही स्पर्धा २०२६ च्या महिला विश्वचषकासाठी थेट पात्रता मिळवण्याचे एक मार्ग देखील असेल. गेल्या शिबिरात सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना यामध्येही संधी देण्यात आली. भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, हे शिबिर अतिशय महत्त्वाच्या वेळी आयोजित केले जात आहे. आशिया कप ही एक प्रतिष्ठित स्पर्धा आहे आणि २०२६ च्या विश्वचषकात थेट प्रवेश मिळवण्याचा एक मार्ग देखील आहे. आमचे संपूर्ण लक्ष मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या स्वतःला तयार करण्यावर असेल.

**खेळाडूंची नावे**

**गोलरक्षक:** सविता, बिच्छू देवी खरीबम, बन्सरी सोलंकी,माधुरी किंदो, समीक्षा सक्सेना
**बचावपटू:** महिमा चौधरी, निक्की प्रधान, सुशीला चानू, उदिता, इशिका चौधरी, ज्योती छत्री, ज्योती, अक्षता ढेकळे, अंजना डुंगडुंग, सुमन देवी
**मिडफिल्डर:** सुजाता कुजूर, वैष्णवी विठ्ठल फाळके, नेहा, सलीमा टेटे, मनीषा चौहान, आजमिना कुजूर, सुनीलिता टोप्पो, लालरेमसियामी, शर्मिला देवी, बलजीत कौर, महिमा टेटे, अलबेला राणी टोप्पो, पूजा यादव

**विक्री सूचना**
**हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
परिसमापकः रोशन चोरडिया
परिसमापकाचा पत्ता - ११४, सोलारिस हबटाऊन, पूर्व-पश्चिम फ्लायओव्हरजवळ, अंधेरी (पू), मुंबई (एम.एच)
ईमेलः cirp.hybrofoods@gmail.com | मोबा.: ७०००९११७११

**ई-लिलाव**
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री
**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळः दि. ३१ जुलै, २०२५ रोजी दु. ३.०० ते सायं. ४.०० पर्यंत**
**ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांकः दि. २८ जुलै, २०२५**
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)
**संभाव्य बोलीदाराद्वारे पात्रता दस्तऐवज सादरीकरणाचा दिनांकः दि. २८ जुलै, २०२५**

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठाद्वारे आदेश दिनांक २७ मार्च, २०२५ (दि. २९ मार्च, २०२५ रोजी आदेश सूचित करण्यात आला) नुसार नियुक्त परिसमापकाद्वारे स्थापित परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)** च्या मालकीच्या संपत्ती आणि मालमत्तांची विक्री. विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म www.baanknet.com मार्फत करण्यात येईल.

भारतीय रुपये

| संपत्ती | ब्लॉक | राखीव किंमत | ईएमडी रक्कम | विस्तारयोग्य रक्कम |
|---|---|---|---|---|
| **येवला**, जि. नाशिक (एम.एच.) **येथील वाहने**<br>टाटा ट्रक - MH04GF3771,<br>टाटा ट्रक - MH04HD9036,<br>टाटा ट्रक - MH04HD9037 | बी | ४३४६२५ | ४३४६३ | १०००० |

ई-लिलाव जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे तत्त्वावर आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर सेवा प्रदाता म्हणजेच www.baanknet.com मार्फत आयोजित करण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी हमीपत्र सादर करावयास हवे की, ते संकेताच्या कलम २९ए अन्वये लागू मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करीत नाहीत आणि जर कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची उद्घोषणा समाविष्ट असलेली आवश्यक कागदपत्रे फक्त इलेक्ट्रॉनिक लिलाव प्लॅटफॉर्म द्वारे सादर करावी.
संभाव्य बोलीदाराने इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी.

सही/-
**रोशन चोरडिया**
**हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक म्हणून**
एनसीएलटी आदेश दिनांक २७.०३.२५ नुसार
पत्ताः ११४, सोलारिस हबटाऊन, एन. एस. फडके मार्ग,
पूर्व पश्चिम फ्लायओव्हरजवळ, अंधेरी (पू), मुंबई ४०००६९.
ईमेलः cirp.hybrofoods@gmail.com
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347
एएफए वैधता दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत.
संपर्क क्र.: ७०००९११७११
दिनांकः २०.०७.२०२५
ठिकाणः मुंबई

**जाहीर सूचना**
(नादारी आणि दिवाळखोरी मंडळ संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)
**कॉर्पोरेट ऋणको फर्नेस फॅब्रिका (इंडिया) लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. बद्री प्रसाद यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोच्या वैयक्तिक जामीनदाराचे (पीजी) नाव, जो फर्नेस फॅब्रिका (इंडिया) लिमिटेडला करारामध्ये हमीदार होता | श्री. बद्री प्रसाद |
| २ | पीजीच्या निवासाचा पत्ता | ८०२, प्रोग्रेसिव्ह सीलॉन्ज प्लॉट क्र. ४४-४५, सेक्टर १५ पाम बीच रोड, क्रोमाजवळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, कोकण भवन, ठाणे, महाराष्ट्र -४००६१४. |
| ३ | निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाचे तपशील | माननीय एनसीएलटी द्वारे सीपी(आयबीसी)/३२/केओबी/२०२३ दिनांक १४.०७.२०२५मध्ये आयए/(आयबीसी)/४८२/केओबी/२०२४ नुसार फर्नेस फॅब्रिका (इंडिया) लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. बद्री प्रसाद यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. |
| ४ | आयबीसी, २०१६ अन्वये पीजीच्या संदर्भात दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक | १४.०७.२०२५ |
| ५ | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | राजेश रमणानी<br>IBBI/IPA-002/IP-N00993/2020-2021/13187 |
| ६ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | डी-४४, दुसरा मजला, नारायणा विहार, नवी दिल्ली - ११००२८.<br>ईमेलः rajeshramnani2407@gmail.com |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः ८३, नॅशनल मीडिया सेंटर, शंकर चौक, सेक्टर २४, गुरुग्राम - १२२००२.<br>ईमेलः pg.badriprasad@gmail.com |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०८.२०२५ |
| ९ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | वेबलिंकः<br>https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दि. १४.०७.२०२५ रोजी श्री. बद्री प्रसाद यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री. बद्री प्रसाद यांच्या धनकोंना याद्वारे दि. १०.०८.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांचे दावे पुराव्यासह ठराव व्यावसायिकांना नोंद क्र. ८ मध्ये उल्लेखिलेल्या पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह व्यक्तिशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करावे.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**राजेश रमणानी**
**ठराव व्यावसायिक**
**दिनांकः १९.०७.२०२५**
**दिनांकः गुरगाव**
**नोंद. क्र.** IBBI/IPA-002/IP-N00993/2020-2021/13187
एएफए दि. ३१.१२.२०२५ पर्यंत वैध

# विक्री सूचना

## हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)

**अवसायक : रोशन चोरडिया**

**अवसायकाचा पत्ता : ११४, सोलारिस हबटाऊन, ईस्ट-वेस्ट फ्लायओव्हर जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई (महाराष्ट्र)**

**ई-मेल : cirp.hybrofoods@gmail.com | मो. - ७०००९११७११**

### ई-लिलाव

दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ अंतर्गत मालमत्तेची विक्री

**ई-लिलावाची तारीख आणि वेळ: ३१ जुलै २०२५, दुपारी ३.०० ते ४.०० पर्यंत**

**बयाणा रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख : २८ जुलै २०२५**

(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद मुदतवाढीसह)

संभाव्य बोलीदारांनी पात्रतेची कागदपत्रे सादर करण्याची तारीख : २८ जुलै २०२५

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT), मुंबई खंडपीठाने दिनांक २७ मार्च २०२५ रोजीच्या आदेशानुसार (आदेश २९ मार्च २०२५ रोजी कळवला गेला) नियुक्त केलेल्या अवसायकाद्वारे, अवसायन संपदेचा (Liquidation Estate) भाग असलेल्या **हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)** च्या मालकीच्या मालमत्ता आणि संपत्तीची विक्री केली जाईल. ही विक्री खाली सही करणाऱ्याद्वारे www.baanknet.com या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे केली जाईल.

भारतीय रु.

| मालमत्ता | गट | राखीव मूल्य | इसारा रक्कम | विस्तार मूल्य |
|---|---|---|---|---|
| **येवला, जि. नाशिक** (महाराष्ट्र) येथील वाहने - टाटा ट्रक - MH04GF3771, टाटा ट्रक - MH04HD9036, टाटा ट्रक - MH04HD9037 | ब | ४३४६२५ | ४३४६३ | १०००० |

ई-लिलाव जसे आहे जिथे आह, जसे आहे तसे आणि जे काही आहे त्या आधारावर आणि कोणत्याही प्रकारच्या दाव्याशिवाय या तत्त्वावर सेवा प्रदाता म्हणजेच www.baanknet.com द्वारे आयोजित केला जाईल.

संभाव्य बोलीदारांनी एक हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे की ते संहितेच्या कलम २९अ अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेने ग्रस्त नाहीत आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली बयाणा रक्कम जप्त केली जाईल.

संभाव्य बोलीदारांनी आवश्यक कागदपत्रे, दिवाळखोरी आणि नादारी संहितेच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेच्या घोषणेसह, केवळ इलेक्ट्रॉनिक लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच सादर करावीत.

संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) Baanknet लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी.

**सही/-**
**रोशन चोरडिया**
**हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेडचे अवसायक म्हणून**
(NCLT आदेश दिनांक २७.०३.२५ नुसार)
पत्ता : ११४, सोलारिस हबटाऊन, एन. एस. फडके मार्ग, ईस्ट-वेस्ट फ्लायओव्हर जवळ,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९
ई-मेल : cirp.hybrofoods@gmail.com
IBBI नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347
AFA 31 डिसेंबर २०२५ पर्यंत वैध
संपर्क क्र. : ७०००९११७११
दिनांक : २०/०७/२०२५, ठिकाण : मुंबई